MHSO100008982025

**वि.दि.दा.क्र.९५/२०२५ मधील नि.क्र.२६ खालील आदेश.**

प्रतिवादी क्र.२ ने सदरचा अर्ज त्याची कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी केलेला आहे. प्रतिवादीने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, त्याला महत्वाचे दस्तऐवज उपलब्ध झाले नसल्यामुळे त्याला मुदतीत कैफियत देता आली नाही. प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास जाणीवपुर्वक विलंब केलेला नाही. प्रतिवादी हा सदरचे अर्जासोबत कैफियत दाखल करीत आहे. त्यामुळे सदरची कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करावा असे त्याने म्हटले आहे. शेवटी त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास वादीने जबाब दिलेला असून त्यामध्ये त्याने प्रतिवादीच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्याने पुढे म्हटले आहे की, प्रतिवादींनी सदरचा अर्ज मंजूर करण्यासाठी योग्य व संयुक्तीक कारण दिले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री.चौंडकर व वादीतर्फे विद्वान वकील श्री.देव यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.२ याला सदरचे दाव्याचे समन्स ता.१६.०९.२०२५ रोजी बजावले आहे, परंतु त्याने विहीत मुदतीत त्याची कैफियत दाखल केली नाही. त्यानंतर ता.१३.०३.२०२६ रोजी प्रतिवादीने सदरचा अर्ज दिलेला आहे व अर्जासोबत त्याची कैफियत दिलेली आहे. त्याने त्याची कैफियत दाखल करण्यास विलंब का झाला, याबाबतचे संयुक्तिक स्पष्टीकरण दिलेले आहे. सदरचे दाव्याचे कायमचे निराकरन करण्यासाठी व प्रतिवादीला त्याची बाजू मांडणेसाठी संधी देणेसाठी सदरची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायाच्या हितार्थ आवश्यक आहे. प्रतिवादीला जर सदरची संधी देण्यात आली नाही तर त्याला न्याय नाकारलेसारखे होईल. तसेच दोन्ही पक्षकारांचा पूर्ण पुरावा न्यायालयासमोर आला तर न्यायालयाला योग्य न्यायनिवाडा करणे सोयीचे होईल. त्यामुळे प्रतिवादीला कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ

करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. प्रतिवादीने त्याची कैफियत दाखल करण्यास ०४ महिने व २५ दिवसांचा विलंब केलेला आहे. त्यामुळे त्याबाबत त्याने वादीला खर्चाची रक्कम देणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा नि.क्र.२६ चा अर्ज प्रतिवादी क्र.२ ने वादीला खर्चाची रक्कम रु.१,०००/–(अक्षरी रुपये एक हजार फक्त) देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.04.18 17:06:35 +0530

ता.१८.०४.२०२६. (सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माळशिरस.

**वि.दि.दा.क्र.९५/२०२५**
**मधील नि.क्र.२६ खालील आदेश.**

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री. म.पां. सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.१८.०४.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.१८.०४.२०२६.

आदेश स्वाक्षरीत केल्याचा दि.१८.०४.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.१८.०४.२०२६.

स्वाक्षरीत/-
(म. पां. सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.